# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 14 January 2026
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १४ जानेवारी २०२६ सायंकाळी ६.१०**

****

- राज्यात २९ महापालिकांसाठी उद्या मतदान–प्रशासकीय यंत्रणा सज्ज
- मतदान केंद्रांवर पथकं रवाना–मतदानांना निर्भयपणे मतदानाचं आवाहन
- मकरसंक्रांतीचा सण देशभरात पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरा

आणि

- डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिनी विविध कार्यक्रमांचं आयोजन

****

राज्यातल्या २९ महानगरपालिका निवडणुकांसाठी उद्या मतदान होणार आहे. सर्व महापालिकांमधल्या ८९३ प्रभागांमधल्या दोन हजार ८६९ नगरसेवक पदांसाठी १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहेत. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर सह जालना, परभणी, लातूर आणि नांदेड महापालिकेसाठी मतदान होणार आहे. मतदान साहित्याचं वाटप आणि अधिकारी तसंच कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रांवर पोहोचवण्याचं काम अंतिम टप्प्यात आलं आहे.

नागरिकांना मतदान करता यावं, यासाठी महापालिका क्षेत्रातल्या सर्व कार्यालयांना उद्या सुटी जाहीर करण्यात आली आहे. विविध ठिकाणी मतदान करणाऱ्यांना प्रोत्साहन म्हणून विविध सवलती दिल्या जाणार आहेत. महापालिकांसाठी प्रभागनिहाय मतदानाची ही पहिलीच वेळ आहे. या मतदान प्रक्रियेविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून –

***महापालिकांमध्ये तीन, चार किंवा पाच सदस्यीय प्रभाग रचना असल्याने, मतदानांना आपल्या प्रभागात जितके सदस्य तितकं मतदान करावं लागणार आहे. प्रभागातल्या प्रत्येक मतदार संघासाठी मतदान यंत्रावर वेगवेगळ्या रंगाच्या मतपत्रिका असतील. या प्रत्येक मतपत्रिकेवर सर्व उमेदवारांची नावं तसंच वरीलपैकी एकही नाही म्हणजे नोटा हा पर्याय असेल. मतदाराला सर्व रंगांच्या मतपत्रिकेवरचं आपल्या पसंतीचं एकेक बटन दाबायचं आहे. बटन दाबलं की त्यासमोरचा छोटा लाईट लागेल. सगळ्यात शेवटच्या मतपत्रिकेवरचं बटन दाबलं की बीप आवाज येईल.. हा आवाज म्हणजे आपण दिलेली सर्व मतं नोंदवली गेल्याचा संकेत आहे. छत्रपती संभाजीनगर महापालिकेने तयार केलेल्या csmc vote kar.com या संकेतस्थळावर या मतदानाचं प्रात्यक्षिक करता येणार आहे. छत्रपती संभाजीनगरचे महापालिका आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांनी नागरिकांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे.***

छत्रपती संभाजीनगर महापालिका क्षेत्रात एक हजार २३७ मतदान केंद्रांवर ५ हजार ५८८ अधिकारी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हे सर्व अधिकारी मतदानाचं साहित्य घेऊन आपापल्या केंद्रांकडे रवाना झाले.

जालना इथं २९१ मतदान केंद्रांवर मतदान साहित्यासह पथकं रवाना झाली, यामध्ये एक हजार ४५५ अधिकारी तसंच कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

परभणी इथं ३४१ मतदान केंद्रांसाठी एकूण एक हजार ६१६ अधिकारी कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

लातूर महानगरपालिका निवडणुकीसाठी नियुक्त मतदान पथकांना शासकीय महिला तंत्रनिकेतन इथं सर्व साहित्याचं वाटप करण्यात आलं. सर्व मतदान केंद्रांवर पोलिस बंदोबस्तासह कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे.

****

महानगरपालिकेच्या निवडणुकीत सर्व मतदारांनी निर्भयपणे मतदान करण्याचं आवाहन प्रसिद्ध अभिनेते सुबोध भावे यांनी केलं आहे.

**बाईट – सुबोध भावे**

****

महानगरपालिका निवडणूकांसाठीचा प्रचार काल संपल्यानंतर घरोघरी जाऊन प्रचार करण्यासंदर्भात कुठलाही नवीन आदेश जारी केलेला नाही, असं राज्य निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. जाहीर प्रचार समाप्तीनंतर मतदान केंद्राच्या १०० मीटर परीघाबाहेर उमेदवार हे मतदारांना भेटून किंवा घरोघरी जाऊन प्रचार करु शकतात, असं आयोगाने म्हटलं आहे. परंतू या दरम्यान उमेदवारांना माईकचा वापर करता येणार नाही किंवा समुहानेदेखील फिरता येणार नाही, असंही आयोगानं सांगितलं आहे.

****

राजकीय पक्षांना जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत तात्पुरत्या स्वरुपात निवडणूक चिन्ह आरक्षित करून हवं असेल, तर त्यांनी उद्या गुरुवारपर्यंत अर्ज करणं आवश्यक आहे. निवडणूक आयोगाकडं नोंदणी असलेल्या आणि विशिष्ट अटींची पूर्तता करणाऱ्या नोंदणीकृत, पण मान्यताप्राप्त नसलेल्या पक्षांसाठी ही सुविधा असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक प्रक्रियेबाबत आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी तातडीने आढावा घेतली. यावेळी स्वामी यांनी प्रशासकीय तयारी, प्रतिबंधात्मक कारवाया, तसंच कायदा सुव्यवस्था याबाबत आढावा घेतला.

****

मकरसंक्रांतीचा सण आज सर्वत्र साजरा होत आहे. महिलावर्गाने पारंपरिक पद्धतीने सौभाग्यदानं आणि तीळगूळ देऊन हा सण साजरा केला. देशभरात विविध स्वरुपात हा सण साजरा केला जातो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्ली इथं केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल मुरुगन यांच्या निवासस्थानी पोंगल समारंभात सहभाग घेतला. कृषिसंस्कृतीशी जोडलेल्या या उत्सवाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करतांना पंतप्रधान म्हणाले –

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

****

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ३२ वा नामविस्तार दिन आज साजरा होत आहे. यानिमित्तानं छत्रपती संभाजीनगरसह विद्यापीठाशी संलंग्रित महाविद्यालयांमध्ये विविध कार्यक्रम पार पडले. विद्यापीठात, 'नामविस्ताराची हकिकत' या विषयावर प्रख्यात कवी फ.मु.शिंदे यांचं व्याख्यान झालं. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देणं हा फक्त प्रशासकीय निर्णय नव्हता, तर तो दलित-बहुजन समाजाच्या आत्मसन्मानाचा आणि बौद्धिक हक्काचा लढा होता असं प्रतिपादन शिंदे यांनी यावेळी केलं. कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांनी, यावेळी बोलतांना, बाबासाहेबांच्या नावाला साजेसे काम इथले शिक्षक, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांकडून होणे अपेक्षित असल्याचं मत व्यक्त केलं.

नामविस्तार दिनानिमित्त भीमगीत गायनासह विविध स्पर्धांचं बक्षीस वितरण करण्यात आलं. अँटी रॅगींग सप्ताहनिमित्त घेतलेल्या स्पर्धाचीं पारितोषिकं प्रदान करण्यात आली. यामध्ये रिल्स स्पर्धेत पवन देवडे, पोस्टर स्पर्धेत मानसी जोशी, तर निबंध स्पर्धेत वर्षा विश्वभिते यांना प्रथम क्रमांकाचं बक्षीस देऊन गौरवण्यात आलं. यासोबतच वार्षिक परिक्षेतील गुणवंत ११ विद्यार्थ्यांना सुर्वणपदक प्रदान करण्यात आलं.

****

क्रिकेट

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या एकदिवसीय मालिकेतला दुसरा सामना राजकोट इथं सुरू आहे. न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. भारतानं प्रथम फलंदाजी करत निर्धारीत ५० षटकात ७ बाद २८४ धावा केल्या. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा पाचव्या षटकात बिनबाद २१ धावा झाल्या होत्या. मालिकेतला पहिला सामना जिंकून भारत १-०नं आघाडीवर आहे.

****

भारतीय खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत आज किदंबी श्रीकांत, एच एस प्रणॉय, तसंच मालविका बनसोड यांनी आपापले एकेरी सामने जिंकून पुढच्या फेरीत प्रवेश केला. पी व्ही सिंधूला मात्र पराभवाचा सामना करावा लागला.

****

बासर – नवीपेट रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाच्या कार्यासाठी लाईन ब्लॉक घेण्यात आल्यामुळे १७ ते २३ जानेवारी दरम्यान काही गाड्यांच्या वेळापत्रकात तात्पुरते बदल करण्यात येणार आहेत. काही गाड्या रद्द तर काही अंशतः रद्द करण्यात आल्या आहेत. दक्षिण मध्ये रेल्वेच्या नांदेड येथील जनसंपर्क विभागाने ही माहिती दिली.

****

'गोष्ट बीड जिल्ह्याच्या इतिहासाची' या इतिहास विषयक पुस्तकावर आधारित बीड जिल्हा परिषदेनं प्रज्ञाशोध परीक्षेचं आयोजन केलं आहे. चार फेब्रुवारी २०२६ रोजी ही परीक्षा होणार असून, इच्छुक शाळांनी संपर्क साधण्याचं आवाहन बीड जिल्हा इतिहास परिषदेनं केलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नोंदणी आणि मुद्रांक शुल्क कार्यालयाच्या जळीतकांडाचा तपास सीआयडीकडे सोपवण्यात आला आहे. गेल्या शनिवारी १० जानेवारीला ही घटना घडली होती.

****